**नियमित दिवाणी दावा नं. १९/२०२०**

**निशाणी क्रमांक ६९ वरील आदेश**

**सी.एन.आर.क्र. MHKO110002432020**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता, क्रम ६ नियम १७ अन्वये कैफियत प्रतिदावा दुरुस्ती करणेकामी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी वादी यांच्याविरुद्ध मनाईकरीता प्रतिदावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांच्याकडून नजरचुकीने व अनावधानाने अर्जात नमुद केलेले मजकुर समाविष्ट करण्याचे राहून गेले. त्याकरीता त्यांनी निशाणी क्र.१५ ची कैफियत व प्रतिदावा मधील पान क्र.९ नंतर अर्जात नमुद केलेला मजकुर समाविष्ट करुन दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.७० कडे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. तसेच निशाणी क्र.५ व निशाणी क्र.३४ चे तुर्तातुर्त मनाई अर्जावर दोन्ही पक्षकारांनी युक्तीवाद केला आहे. सदर दोन्ही अर्ज आदेशाकरीता प्रलंबित आहे. प्रतिवादी केवळ काम लांबविण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर दुरुस्ती वादी यांना मान्य नसुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली.

४. प्रतिवादी व वादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. दोन्ही बाजूंची कथने विचारात घेता अर्जाचे निकाल निश्चीतीकरिता खालील वादप्रश्न उपस्थित झाले त्यांचेवरील निष्कर्ष आणि कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.क. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्थावित सुधारणा मंजूर करणे न्यायोचित ठरते का ? | **होय** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**<u>वादप्रश्न क्र. १ करिता</u> :**

**६.** वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांचेविरूध्द कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे.

**७.** दिवाणी प्रकिया संहिता क्रम ६ नियम १७ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्याच्या कोणत्याही स्थितीमध्ये कोणताही पक्षकार त्याच्या कथनामध्ये जर दाव्याचे मुळ स्वरूप बदलत नसेल तर आवश्यक ती दुरूस्ती करू शकतो. सदरची दुरूस्ती ही पक्षकारांचा मुळ प्रश्न उकल करण्याकरिता गरजेची असणे आवश्यक आहे.

**८.** प्रस्तुत अर्जाद्वारे वादी प्रतिवादी यांच्याविरुद्ध अर्जात कथन केल्याप्रमाणे अर्जात नमुद केलेले वादी यांच्याकडून नजरचुकीने व अनावधानाने अर्जात नमुद केलेले मजकुर समाविष्ट करण्याचे राहून गेले. त्याकरीता त्यांनी निशाणी क्र.१५ ची कैफियत व प्रतिदावा मधील पान क्र.९ नंतर अर्जात नमुद केलेला मजकुर समाविष्ट करुन दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. प्रस्तुत प्रस्तावित सुधारणा मंजूर केल्याने दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे आजरोजी सदर कारणास्तव वादीची मागणी नामंजूर करणे न्यायोचित होणार नाही. दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर लागण्याकरिता प्रस्तावित सुधारणा न्याय्य असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता वादप्रश्न क्र.१ करिता मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र. २ करिता</u> :**

९. वरील कारणांचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये ३००/– प्रतिवादीस दिल्यानंतर मंजूर करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (निशाणी क्र.६९) मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या कॉस्टपोटी वादीस रक्कम रुपये ३००/– द्यावेत.

३. प्रतिवादी यांनी आदेशापासून १४ दिवसांमध्ये प्रस्तुतची दुरुस्ती करुन कैफियत व प्रतिदाव्याची प्रत दाखल करावी.

JOSHI ATUL RATNAKAR
Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.08.10 17:08:27 +0530

**पेठ–वडगांव.** **( ए. आर. जोशी )**
**दिनांक १०/०८/२०२६** **२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**